**नवीन बुरुडांना वन विभागाकडे नोंदणी करण्यास मान्यता व बुरुड समाजातील बांबू कारागिरांना पुरवठा करण्यात येणाऱ्या बांबूवरील स्वामित्व शुल्कात सुट देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.३४९/फ-९**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ५ डिसेंबर, २०१४**

**वाचा :-** १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक अबांपू-१०९५/प्र.क्र.१२८/फ-९, दिनांक ३०.५.१९९७

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष-१६/आर-१/बुरड बांबू/४११/९७-९८, दिनांक ३.७.१९९७ चे पत्र.

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष-१६/आर-३/प्र.क्र. ५३ (०६-०७)/ भाग-१/जी-२३/१३-१४, दिनांक ३.७.२०१३ चे पत्र.

४. महसूल व वन विभाग, अधिसूचना दिनांक ३०.१०.२०१४

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यात बांबूवर आधारीत उद्योगास चालना देण्यासाठी, व्यापक प्रमाणात बांबूची लागवड करण्यासाठी तसेच नैसर्गिक व खाजगी क्षेत्रात बांबू लागवड व योग्य व्यवस्थापन करून बांबूच्या उत्पादनामध्ये तसेच बांबूवर आधारीत उद्योजकांना चालना देणे व बांबूचा मुल्यवर्धीत उपयोग वाढवणेकरीता, नवीन बांबू धोरण जाहीर करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्यातील सर्व बुरुडांना पुरवण्यात येणाऱ्या बांबूवरील वन विकास करातून सूट देण्याच्या निर्णयाची अधिसूचना दिनांक ३०.१०.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेली आहे. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.अबांपु-१०९५/प्र.क्र.१२८/फ-९, दिनांक ३० मे, १९९७ अन्वये नोंदणीकृत बुरुड व बांबू व्यवसाय करणा-या कुटुंबांना स्वयंरोजगार मिळण्याकरिता विदर्भातील ९ जिल्हयात दरवर्षी प्रति कुटुंब १५०० बांबूचा पुरवठा निस्तार दरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदर शासन निर्णयानुसार बिगर नोंदणीकृत बुरुड / बांबू व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाच्या नोंदणीसाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे पत्र क्र. क-१६/आर-१/बुरुड बांबू /४११/९७-९८, दिनांक ३.७.१९९७ अन्वये बुरुड / बांबू व्यवसाय करणा-या कुटुंबाच्या नोंदणीसाठी ३० ऑगष्ट, १९९७ अशी तारीख निश्चित करण्यात आली होती. सद्य:स्थितीत राज्यात एकूण नोंदणीकृत बुरुडांची संख्या ७,९०० इतकी आहे. दिनांक ३० ऑगष्ट, १९९७ नंतर नवीन बुरुडांची नोंदणी करण्यात आलेली नाही. नवीन बुरुड / बांबू व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाची नोंदणी करणे, तसेच बुरुड कामगारांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहनासाठी "स्वामित्व शुल्क" न आकारता बांबूचा पुरवठा करणेबाबतही वारंवार शासनास मागणी होत असते. त्या अनुषंगाने

नवीन बुरुड कामगारांना वन विभागाकडे नोंदणी करणे, तसेच बुरुडांना बांबूवरील स्वामित्व शुल्कात (Royalty) सूट देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

सद्य:स्थितीत राज्यात एकूण नोंदणीकृत बुरुडांची संख्या ७,९०० इतकी आहे. दिनांक ३० ऑगष्ट, १९९७ नंतर नवीन बुरुडांची नोंदणी करण्यात आलेली नाही. यामुळे नोंदणी झालेल्या ७९०० बुरुड कुटूंबा व्यतिरिक्त ज्या बुरुड कुटुंबाची वन विभागाकडे नोंदणी करण्यात आली नाही, त्यांची नोंदणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ज्या बुरडांनी / बांबू व्यवसाय करणाऱ्यांनी नोंदणी केली नाही, त्यांनी खालील पध्दतीप्रमाणे नोंदणी करावी :-

बिगर नोंदणीकृत बुरुड बांबू व्यवसाय करणाऱ्या कुटूंबाच्या नोंदणीसाठी अर्ज संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे करण्यात यावेत. नोंदणीसाठी अर्ज वनपरिक्षेत्रस्तरावर स्विकारण्यात यावेत. याबाबत वनपरिक्षेत्रातील सर्व गावांमध्ये विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी. त्या अर्जामध्ये मागणी करणाऱ्या व्यक्तिचे संपूर्ण नाव, पत्ता, बुरुड / बांबू व्यवसाय करणारे आहेत आणि किती बांबूची आवश्यता आहे, याबाबतची माहिती तसेच अर्जासोबत खाली नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे :-

अ) सदर नोंदणी अर्ज संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे भरून द्यावा. अर्जासोबत बुरुड असल्याबाबत जातीचे नियमाप्रमाणे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक सीबीसी-१४९३/ प्र.क्र.२१०/मावक, दिनांक ९.११.१९९५ मधील शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी-१०७७/५०८७६/कार्यासन-५, दिनांक २१.३.१९७९ नुसार घेण्यात यावे.

ब) बांबू व्यवसाय करणारे असल्यास त्यांची बांबूपासून विविध वस्तू तयार करीत आहोत, याबाबत संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच / नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी, तहसिलदार यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

क) नोंदणी अर्ज वरीलप्रमाणे भरून आवश्यक प्रमाणपत्र जोडून ते अर्ज वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यावर, वनपरिक्षेत्र अधिकारी हे अर्ज संबंधित उपवनसंरक्षक यांच्याकडे पाठवतील. उपवनसंरक्षक यांना त्यांची खात्री पटल्यास ते संबंधितांना बुरूड नोंद वहया देण्यासंबंधी वनपरिक्षेत्र अधिकारी यांना सूचना देतील.

ड) निस्तार दरावर बांबू मंडप उभारण्यासाठी किंवा सेंटरींगच्या उपयोगासाठी किंवा इतर कामासाठी जिथे सरळ बांबूचा वापर केला जातो. तसेच, बुरुड व्यवसाय सोडून इतर व्यापारासाठी बांबूचा उपयोग करणाऱ्या कामगारांना बांबूचा पुरवठा करण्यात येणार नाही.

शासनाच्या प्रचलित धोरणानुसार निस्तार दर ठरवायचे असल्याने लिलावात प्राप्त झालेली किंमत वजा निष्कासन खर्च = स्वामित्व शुल्क याप्रमाणे प्रथम स्वामित्व शुल्क निश्चित करण्यात येते. त्यानंतर निस्तार दर = ५०% स्वामित्व शुल्क + निष्कासन खर्च या सूत्रानुसार निस्तार दर

ठरविण्यात येतो. बांबू धोरणाच्या अनुषंगाने बुरुड समाजातील बांबू कारागिरांना पुरवठा करण्यात येणाऱ्या बांबूवरील स्वामित्व शुल्कात सूट प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. अशी सवलत प्रति कुटूंब प्रतिवर्षी १५०० बांबू इतक्या मर्यादेत देण्यात येईल.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३०८/ २०१४, दिनांक १७.११.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.वा.पाटील)
**कार्यासन अधिकारी**
**महसूल व वन विभाग**

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक, तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संसाधन उपयोग),महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व जिल्हाधिकारी.
१०. सर्व मुख्य वनसंरक्षक.
११. सर्व उपवनसंरक्षक.
१२. सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), १/२, मुंबई / नागपूर.
१४. महालेखापाल (लेखा परिक्षा), १/२, मुंबई / नागपूर.
१५. वित्त विभाग (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
१६. सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती, फ-९ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२